# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २३/१०/२०२३

➢ **दुखापत :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे राजापेठ अप क्रं. ९२४/२०२३ कलम ३२४,५०४ ,५०६,३४ भादवी | फिर्यादीचे घरासमोर सार्वजनिक रोडवर बोध्द विहार जेवड नगर ्अमरावती | दि २२/१०/२३ चे २२.३० वा.<br><br>दा. ता. वेळ २३/१०/२३ चे ०३ -५५ वा. | विष्णु महादेवराव डोंगरे वय ५८ वर्ष रा. बोध्द विहार जेवड नगर्अमरावती | १.वासुदेव श्रावण तायडे वय अं. ४५ वर्ष , २) विक्की वासुदेव तायडे वय अं. २२ वर्ष , ३) पारस मधुकर तायडे सर्व रा. बोध्द विहार जेवड नगर ्अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील फर्यादी व आरोपी हे शेजारी राहत असुन फिर्यादी व आरोपी यांचे जुणेवादविवाद आहे. नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे आपले घरासमोर उभे असतांना आरोपी क्र १ व २ हे दारू पिणेकरिता उधार पैसे मागण्याकरिता आले असता फिर्यादीने माझ्या जवळ पैसे नाही असे म्हटले असता आरोपी क्र. १ व २ याने फिर्यादीस सिमेन्टच्या ब्लाँकने डोक्यावर मारले फिर्यादीने संपुर्ण घटनेची माहिती फिर्यादीच्या मुलास समजावुन सांगितली असता व तो घरि आला असता व आरोपी क्र. १ व आरोपी क्र. ३ यांना विचारणा केली असता आरोपी कर्. १ व ३ यांनी सुध्दा मुलास सिमेन्टच्या ब्लाँकने डोक्यावर मारले. असा फिर्यादीचे बयानावरून सदरचा गुन्हा DO आदेशाने दाखल |

➢ विनयभंग:-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे राजापेठ अप क्रं. ९२५/२०२३ कलम ३५४ भादवी | अमरावती | दि २२/१०/२३ चे २२.३० वा. सुमारास दा. ता. वेळ २३/१०/२३ चे ०५.०१ वा. | एक महिला. | पृख्वीराज रूपराव राऊत वय ४५ वर्ष रा. दसरा मैदान झ ोपडपच्ची वसंतराव नाईक झेपड्पटेटी वसंतराव नाईक नगर अमरावती | हकीकत अश्या प्रकारे आहे की नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही तिचे घरि एकटी असता त्याचे घरासमोर राहणारा नमुद आरोपी इसम हा फिर्यादीचे घरि आला व फिर्यादी यांना वाईट उद्देशाने शरिराला हात लावुन तु मला चांगली दिसते असे म्हटल्याने फिर्यादी यांचे मनास लज्जा निर्माण झाली असे फिर्यादी यांचे तोंडी तक्रारिवरून कलम ३५४ भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल |

- **वाहन चोरी :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पो.स्टे. फ्रेजरपुरा अम.शहर अप क्र. ९०३/२०२३ कलम ३७९भादवि | कमीशनर कॉलनी भातकुली तहसील समोर कॉटर न. जी.१३ अमरावती | घ.ता.व वेळ दि. २१/१०/२०२३ चे १९.०० वा दा.ता.वेळ दि. २३/१०/२०२३ चे १४.२६ वा | सुमित ज्ञानेश्वर प्रधान वय ३१ रा. कमीशनर कॉलनी भातकुली तहसील समोर कॉटर न.जी.१३ अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळि व ठिकाणी फिर्यादी मोटर सायकल क्र एम २७ बिटी ०२२७ होन्डा ड्रिम ११० सी.सी ने कामावरून घरी आलो व फिर्यादीने गाडी घरासमोर उभी करून मी रात्री जवन करून झोपलो व दुस—या दिवशी सकाळी ०५.०० वा मी उठलो व मी ज्या ठिकाणी गाडी लावली होती त्या ठिकाणी गाडी मिळुन आली नाही माझी गाडी क्र क्र एम २७ बिटी ०२२७ होन्डा ड्रिम काळया रंगाची जिचा चेचीस क्र **MH4JC673JC8063157** व इंजीन क्र **jc67e82062461** , असा एकुन कि. अंदाजे ३०००० रू ची कोणी तरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली मी शोध घेतला मिळुन आली नाही अशा फिर्यादीचे जबाणि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

- **चोरी :-**

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो ठाणे सिटी कोतवाली अप | मसानगंज नवीन शाळा क्र २ मसानगंज | दि.२२.१०.२३ चे ११.५०वा दि२३.१०.२३ चे ०२.११ वा | एक महिला | प्रफुल बिजोरे वय अंदाजे २५ वर्षे रा मसानगंज अमरावती | जबानि रीपोर्ट मी समक्ष पोलीस स्टेशनला येवुन जबानि रिपोर्ट देते की मी वर नमुद पत्यावर आई आजी दोन भाउ आणि मी असे कुटुंबासह राहते सध्या नवरात्र सण असल्याने माझे दोन्ही भाउ बालाजी मंदीर येथे गरभा खेळण्याकरीता जात असतात त्यामुळेते नेहमी उशीरा रात्री घरी येतात त्याकरीता आम्ही घराचे दार हे बंद करत नाही ते दार उघडे राहते माझेकडे **VIVO** कंपनीचा मॉडेल क्र वाय ११ हा मोबाईल असुन तो मी स्ताहा वापरते. दिनांक २२/१०/२३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | क्र.४७७/२३ कलम ३८० भादवी | अमरावती | | | | रोजी रात्री माझ मोबाईल माझे आईजवळ होता मी झोपलेली असतांना रात्री ११.५० वा सुमारास अचानक माझे आई हिचा ओरडण्याचा आवाज आला त्यामुळे मी जागी झाली तेव्हा माझी आई चोर चोर असे ओरडत होती मी उठल्यानंतर माझे आईने सांगीतले की ती माझे मोबाईलमध्ये यु टयुब पाहत होती व मोबाईल घरात ठेवुन ती बाथरुमला गेली असतांना एका मुलाने माझा मोबाईल घरातुन चोरुन तो पळुन गेला आणि त्याला पळुन जात असतांना आईने त्याला पाहीले असुन तो मसानगंज परीसरात राहणारा प्रफुल बिजोरे वय अंदाजे २५ वर्ष हा असलयाचे आईने सांगीतले त्यावेळी गरभा खेळण्यसाठी गेलेला माझा भाउ हा घरी परत येत असतांना त्याला सुध्दा प्रफल बिजोर वय अदाजे २५ रा मसानगंज हा आमच्या घराकडुन त्याचे हातात एक मोबाईल घेवुन पळुन जाताना दिसला त्यामुळे माझी खात्री झली की प्रफुल बिजोर याने आमच्या घरातुन माझा **VIVO** कंपनीचा मॉडेल क्र वाय ११ किंमत अंदाजे ४०००/- रुपये त्याचा **IMEI NO 869473042547355 869473042573348** मोबाईल त्यात एअरटेल कंपनीचे सीम असा जुना वापरता मोबाईल चोरुन नेला आहे त्यामुळे प्रफुल बिजोरे वय अंदोजे २५ यांच्याविरुध्द कारवाई होण्यासाठी रिपोर्ट देत आहे फि चे जबानी रिपोट वरुण व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाक्ल |
| २ | पो ठाणे सिटी कोतवाली अप क्र. ४७८/२३ कलम ४५७, ३८० भादवी | अमरावती | दिनांक २२/१०/२०२३ चे रात्री १२.०० वा पासुन ते २३/१०/२३ चे सकाळी ११.०० वा दरम्यान<br><br>दाखल ता वेळ २३/१०/२३ चे १४.४९ वा | एक महिला | अज्ञात | मी समक्ष पोस्टेला येवुन जबानि रिपोर्ट देते की वर नमुद पत्यावर परीवारसह राहते दिनांक २२/१०/२०२३ चे दिवसभर मॉल चालवुन रात्री १२.०० वा मॉल बंद करुन मॉलचे शटरला कुलुप लावुन आम्ही व सर्व नोकर घरी निघुन गेलो दिनांक २३/१०/२०२३ रोजी सकाळी नेहमीप्रमाणे ११.०० वा मॉल उघडले व कॉउंटर जवळ आले असता मला कॉउंटरचे पहीले ड्रॉवरचे कुलुप तुटलेले दिसले तसेच दुस-या ड्रावरचे कुलुप सुध्दा उघडले दिसले त्याचे सुध्दा कुलुप तुटले दिसले मी दोन्ही ड्रॉवरमध्ये पाहीले असता त्यामध्ये ठेवलेले मोबाईल अस्तव्यस्त दिसले कॉउंटरचे पहील्या ड्रॉवरमधुान अंदाजे १५०० रुपये नगदी व दुदुस-या ड्रावर मुधन सॅमसंग ऐ ७ कंपनीचा मोबाईल ज्याचा आय एम इ आय नं ३५५९२२१०४०२३१३६ किंमत अंदाजे ३००००/- रुपये असा एकुण ३१५००/- रुपये चा माल दिसुन आला नाही तसेच मी आणि माझे पती व नोकरानी पहील्या माळयावर जावुन पाहीले असता माळयावरील खिळकी उघडली दिसली व त्याला लागुन फ्रिज ठेवलेला होतो तो सुध्दा खिडकी जवळुन बाजुला ढकललेला दिसला माझे केडीयामॉल इलेक्ट्रॉनीक दुकानात अज्ञात इसम पहील्या माळयावरील खिडकीच्या आत मधुन फ्रिजला ढकलुन पहील्या माळयावरुन ग्राउंड फलोअरला आला सदर इसमाने काउंटरमधील पहीले ड्रॉवरचे कुलुप तोडुन त्यामधुन नगदी १५००/- रुपये वदुस-या ड्रॉवरचे कुलुप तोडुन त्यामुधुन सॅमसंग ऐ ७ कंपनीचा मोबाईल ज्याचा आय एम इ आय नं ३५५९२२१०४०२३१३६ किंमत अंदाजे ३००००/- रुपये असा एकुण ३१५००/- रुपये चा मालदिनाकंक २२/१०/२०२३ चे रात्री १२.०० वा पासुन ते २३/१०/२३ चे सकाळी ११.०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेला म्हणुन मी अज्ञात इसमाविरुध्द कायदेशीर कायवाही करीता रिर्पोट देत आहे हाच माझ जबानि रि आहे माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत केला वाचुन पाहीला बरोबर आहे अशा फि चे जबानी रिपोट वरुण व डि ओ सा यांचे आदेशाने सदरचा गुन्हा दाक्ल |

➢ प्राणातिक अपघात :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | मृतकाचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १० |
| २. | पो.स्टे नागपुरीगेट अमरावती अप क्र ५४८/२३ कलम २७९, ३०४(अ) भादवी लह कलम १८४,१८७ एम.व्ही अँक्ट | रिंग रोड मन्नत हाँलचे समोर अमरावती | दि. २२/१०/२३ चे २१/३० वा दाखल दि. २३/१०/२३ चे ०२/०५ वा | इमरान खान लियाकत खान वय २७ वर्ष रा, अबुजर मस्जीद जवळ बिस्मील्ला नगर अमरावती | पवन प्रमोदराव इंगोले वय २७ रा. कुंड खुर्द ता भातकुली टाटा पिकप क्र एम .एच २६ ए.डी ६२९७ चा चालक | नजाकत खान रियासत खान (मृत) | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी बाहेर असतांना त्यांनी रात्री २२/०० वा दरम्याण त्याचे मोबाईल वर फोन आला की, फिर्यादीचे काका नजाकत खान रियासत खान हे त्याच्या अँटो क्र एम .एच. २७ बी डब्लु १३४३ ने लालखडी रिग रोड मन्नत हाँल समोरुन येत असतांना अपघात झाला अशा माहीवरुन फिर्यादी तेथे लगेच गेले असता माहीती पडले की, फिर्यादीचे काका नजाकत खान रियासत खान हे भाडे सोडुन लालखडी रिंगरोडने घरी परत येत असतांना टाटा २०७ पिकअप क्र एम .एच २६ ए.डी ६२९७ चा चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने लापरवाहीने राँग सोईडने येवुन धडक मारुन अपघात केला त्याकारणाने फिर्यादी चे काका नजाकत खान हे गंभीर जखमी झाले असल्याने लोकांनी त्यांना इलाजाकरिता इर्विन दवाखाना अमरावती येथे नेले असता फिर्यादी दवाखान्यात गेले असता डाँ सा यांनी त्यांना मृत घोषीत केले अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ ईतर :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो स्टे नागपुरीगेट अमरावती अपक्र | अमरावती | दि.२२/१०/२०२३ चे १८/३० वा दाखल दि. | पिडीत महिलेचा भाऊ | १) जावाई २)शेख सलमान रा अलीम नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, माझ्या बहिनेचे लग्न दोन वर्षा पहिले आरोपी क्र ०१ याचे सोबत झाली होती तेव्हा पासुन माझा जावाई मझ्या बहिणीला घरगृती कारणा वरुन मारपीट करते आणी नेहमी भांडण करते आज दि. २२/१०/२३ चे संध्याकाळी ०६/३० वा मला माझा भाऊ याचा फोन आला आणी मला सांगितले की, जवाई आणि त्याच्या सोबत त्याचा मित्र हे दोघे घरी आले आणि मला शिवीगाळ करत आहे. तेव्हा मी आणी माझा भाऊ त्याला |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ५४७/२३ कलम २९४,५०६ भादवी सह कलम ४,२५ आर्म अँक्ट | | २३/१०/२०२३ चे ००/१७ वा | | | समजविण्या करिता गेलो असता माझ्या जावाई आणी त्याचा मित्र यांनी मला अश्लील शिवीगाळ गेली आणी माझा जवाई  यांनी त्याच्या जवऴील चाकु काढुन माझ्या घर जवऴ बांधलेल्या दोन्ही म्हशी च्या पोटात मारुन जख्मी केले आणी आमच्या दोन्ही भावाला मारण्याची धमकी दीली या काणावरुन माझा परिवार भिला आहे म्हणुन मी पोलीस कंट्रोल रुम ला फोन केला तेव्हा पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथील पोलीस आले आणी त्या दोघांना पोलीस स्टेशन ला घेवुन गेले या दोघांनी  माझ्या बहिणीच्या घरगृती वादा वरुम माझे घरी येवुन मला व माझ्या भावाला अश्लील शिवीगाऴ करुन मारण्याची धमकी दिली व माझ्या जवाई नी माझ्या पालतु म्हशी वर पोटावर मारुन जख्मी केले अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |